# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या बैठकीसाठी विविध विभागांकडून विषय मागविण्यात येतात. सदरच्या विषयांचा कामकाजपत्रिकेत समावेश करून ते अधिकार मंडळांच्या सदस्यांना पाठविले जातात. तथापि, सन्माननीय सदस्यांनी सदर विषयांच्या टिपणीत तसेच जोडपत्रांमध्ये आशयाच्या दृष्टीनेही अनेक चुका सातत्याने होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वीही परिपत्रकांद्वारे वेळोवेळी सूचित करण्यात येऊन सुद्धा संबंधित विभागप्रमुख / अधिकारी यांनी त्याची योग्य दखल घेतलेली नाही, असे यातून निदर्शनास येते. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे अधिकार मंडळांच्या कोणत्याही बैठकीसाठी यापुढे विषय पाठवित असताना संबंधित विभागप्रमुख / अधिकारी यांनी पुढील बाबींची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

- विषयाचा मथळा सुस्पष्ट असावा. अधिकार मंडळासमोर विषय आणण्याचा हेतू आणि अपेक्षा मथळ्यातून स्पष्ट व्हाव्यात.
- संबंधित विषयाच्या टिपणीमधील मांडणी आणि आशय विषयाला समर्पक आणि मुद्देसूद असावी. वाक्यरचना सुसंगत आणि स्पष्ट असावी. स्पष्टीकरणासाठी आवश्यक माहिती थोडक्यात पण मुद्देसूदपणे मांडावी. आवश्यकता असल्यास जोडपत्र देण्यात यावे.
- अधिकार मंडळापुढे ठेवण्यात येणारे विषय ज्या त्या वेळी मान्यतेनंतर सभा व निवडणुका विभागास युनिकोड फॉंटमध्ये तयार करून जोडपत्रासह सॉफ्ट कॉपीमध्ये meeting@unishivaji.ac.in या e-mail वर पाठवावेत. तसेच जोडपत्राचा आकार एक एम.बी.पेक्षा कमी असावा.
- विषयाची Hard copy बैठकीची सूचना प्राप्त होताच पाठवावेत.

उपरोक्त सूचना लक्षात घेऊन यापुढे अधिकार मंडळांच्या बैठकीसाठीचे विषय तयार करावेत आणि मा.कुलसचिव यांच्या मान्यतेने सादर करावेत.

कुलसचिव

सभा व निवडणुका विभाग/ 78
दिनांक: १९.०६.२०१८

21 JUN 2018

प्रति
सर्व उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व
प्रशासकीय विभागप्रमुख